महत्त्वाकांक्षी प्रशासक

# ॲडॉल्फ हिटलर

मंदाकिनी भारद्वाज

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**महत्त्वाकांक्षी प्रशासक : ॲडॉल्फ हिटलर**
मंदाकिनी भारद्वाज

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
मंदाकिनी भारद्वाज
'चैत्र' ७ ए, श्री शिवशक्ती सोसायटी,
मयुर कॉलनी, कोथरूड, पुणे- ३८
फोन नं. ०२०-२५४६३२२१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

## *मनोगत*

जगाच्या इतिहासातल्या अत्यंत लोकविलक्षण आणि भयकारी व्यक्तिमत्त्वांपैकी एक ॲडॉल्फ हिटलर. त्याच्याविषयी जेवढं वाचावं तेवढं काहीतरी नवीन समजत जातं. 'ॲडॉल्फ हिटलर' या पुस्तकाचा अनुवाद करतानाही याचा प्रत्यय आला. माझ्या सर्वच लेखनात श्री. भारद्वाज यांचा मोठा सहभाग असतो.

या पुस्तकाची सुबक मुद्रणप्रत तयार करण्यात त्यांची फारच मदत झाली, हे मुद्दाम नमूद.

**– मंदाकिनी भारद्वाज**

✦✦✦

## परिचय

अॅडॉल्फ हिटलर बारा वर्षं जर्मनीचा प्रमुख (सर्वाधिकारी) होता. त्याच्या कारकीर्दीची परिणती दुसऱ्या महायुद्धात झाली. त्या युद्धामध्ये लाखो लोक मारले गेले. याच कारणामुळे आजवरच्या इतिहासात त्याची-हिटलरची-सर्वांत घृणास्पद, दुष्ट, निंद्य व्यक्ती म्हणून गणना केली जाते.

अगदी सुरुवातीपासूनच त्याला कलेची फार आवड होती आणि एक आर्किटेक्ट (वास्तुशिल्पी), कलावंत बनण्याची स्वप्नं तो पाहात असे. तरुण अॅडॉल्फ हिटलरने अशी अनेक वर्षं व्हिएन्नात व्यतीत केली. सोळाव्या वर्षी शाळा सोडल्यानंतर स्थानिक लोक आणि तिथे येणारे पर्यटक यांना स्वतः रंगवलेली पोस्टकार्डं विकून त्यानं स्वतःचा चरितार्थ चालवला. स्वतःच्या आकांक्षा पुऱ्या करण्यासाठी त्याला त्याच्या वडिलांची काहीच मदत झाली नाही. मग जेव्हा त्याच्याजवळचे पैसे संपले, तेव्हा त्यानं निराधार लोकांच्या निवासात बेघर लोकांप्रमाणे राहायला सुरुवात केली. अशा तऱ्हेने अनाथाश्रमात राहत असताना त्याला साम्यवादींच्या विरुद्ध होणाऱ्या पक्षपाताला मोठ्या प्रमाणावर तोंड द्यावं लागलं; कारण शहरात यहुदी लोक बहुसंख्य होते. आपली वैचारिकता बनवण्यात याचा हिटलरला उपयोग झाला.

१९१३ मध्ये हिटलर जर्मनीमधील म्युनिच इथे गेला. तेव्हा शहरातली वास्तुकला आणि कलात्मक सौंदर्यस्थळं यांची त्याला मोहिनी पडली; परंतु ही आपली कलासौंदर्यविषयक तहान भागवताना त्याने पहिल्या महायुद्धात बव्हेरियन सैन्यात नोकरी केली आणि तिसऱ्या लुडविग्च्या अधिपत्याखालील फ्रान्स आणि बेल्जियममध्ये आपली सेवा रुजू केली. शत्रूच्या गोळीबारात जखमी झाल्यानंतर त्याला एक पदकदेखील दिलं गेलं होतं.

एक जर्मन देशभक्त असूनही हिटलरला कोणतंच सरकारी पद मिळू शकलं नाही; कारण तो जर्मनीचा पूर्ण नागरिक नव्हता. पहिलं महायुद्ध संपल्यावरदेखील तो सैन्यातच काम करीत राहिला आणि बढती मिळवत मिळवत त्याने पोलिसातला

'हेर' (गुप्तचर) हा दर्जा मिळवला. तिथे त्याला एक वेगळं काम मिळालं. ते असं होतं की, 'राष्ट्रीय विचारसरणी'चा प्रचार, या योजनेअंतर्गत, छोट्या छोट्या राजकीय गटांना हे समजावून सांगण्याची जबाबदारी टाकली गेली होती की, 'ज्यूं'मुळे जर्मनीवर युद्ध लादलं गेलं आहे.

तो प्रचार करता करता हळूहळू हिटलर उत्तम वक्ता बनला. त्याचं भाषण संपलं की, लोक वेड्यासारखे त्याच्या पाठीमागे लागत आणि तो जे सांगेल, त्याच्यावर विश्वास ठेवीत. काही काळातच हिटलर नवीन नाव धारण केलेल्या नॅशनल सोशालिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीचा नेता बनला आणि साम्यवाद, भांडवलशाहीवाद आणि ज्यू अशांच्या विरोधातल्या त्याच्या भाषणांना राष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळू लागला.

आपल्या काही थोड्या दिवसांच्या कारावासात त्याने आपली आत्मकथा 'माईन काम्फ' लिहवून घेतली. आपण कलाकार म्हणून प्रगती करत असताना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले, याबद्दल त्याने त्या ग्रंथात नमूद केले आहे. त्याचबरोबर आपल्या कलेचा चुकीचा अर्थ लावला गेला आणि त्याची राजकीय विचारप्रणाली कशी कशी बनत गेली, हेही त्याने लिहून ठेवले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाने हिटलरला लाखो मार्क्स्‌ची कमाई झाली आणि दुसऱ्या महायुद्धापर्यंत तर ते पुस्तक वाचणं प्रत्येकासाठी अत्यावश्यक होऊन बसलं.

अमेरिकेची संयुक्त संस्थानं आणि जगाच्या अन्य भागांमध्ये आलेल्या महामंदीमुळे जर्मनीही आर्थिक अडचणीच्या फेऱ्यात सापडला. निम्न वर्ग आणि मध्यम वर्ग यांच्यातली दरी कमी करण्यात हिटलर यशस्वी झाला. कारण त्याला असं वाटत होतं की, ती दरी मिटवल्यामुळे जर्मनीला तिचं पूर्वीचं वैभव आणि प्रतिष्ठा परत प्राप्त करून देता येईल. त्याच्या पक्षानं पक्षात त्याला एक पद दिलं. त्यामुळे त्याला जर्मनीचं नागरिकत्व मिळालं. नंतर त्यानं अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. हिटलरला चॅन्सेलर पदाची (शासनाध्यक्ष) शपथ दिली गेली आणि त्याच्या नाझी पक्षाने बहुतेक सरकारी कार्यालयांवर तत्काळ ताबा मिळवला. अखेरीस अनेक पक्षांची पुरेपूर मदत घेऊन हिटलरने हुकूमशहाची गादी मिळवली. आधी कोणाचाच अधिकार नसलेल्या सैन्यावर आता हिटलरचे नियंत्रण आले.

हिटलरने जर्मनीच्या पायाभूत सोयींमध्ये सुधारणा केल्या आणि वेगवेगळ्या वर्गांचे राहणीमान वरच्या स्तरावर नेले. अन्य युरोपियन देशांना आपल्या ताब्यात

घेण्यासाठी आणि आपल्या प्रगतीच्या आड येणाऱ्या उपद्रवी शक्तींना, विशेषतः ज्यूंना नेस्तनाबूत करण्यासाठी त्याने मोहीम उघडली. हिटलरने जेव्हा पोलंडवर स्वारी केली, तेव्हा त्याला थोपवण्यासाठी अन्य कोणत्याही देशाने काहीच खास प्रयत्न केले नाहीत. हिटलरने नेदरलँडवर स्वारी केली, त्यानंतर फ्रान्सने युद्ध पुकारले; परंतु तोपर्यंत बराच उशीर झाला होता आणि फ्रान्सची हार व्हायला फारसा वेळ लागला नाही. नंतर जपानच्या सोबतीने हिटलरने अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारलं आणि अशा रीतीने दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी तयार झाली.

१९३९ ते १९४५ दरम्यानच्या काळात, म्हणजे हिटलरचा पराभव होईपर्यंत, त्याने आणि हेन्रिक हिमलरने मिळून १ कोटी १० लाख लोकांचे प्राण घेतले. त्यामध्ये साठ लाखांहून अधिक ज्यू होते. या प्रकाराला 'सर्वनाश' म्हटले गेले आहे. ब्रिटन आणि अमेरिकेने म्युनिचवर ताबा मिळवल्यानंतरच युद्धाचा शेवट झाला. जेव्हा विजयी फौजेचे सैनिक हिटलरच्या बंकरपासून काही शंभर मीटर अंतरावर होते, तेव्हा हिटलरने आपली नवपरिणित पत्नी इवा ब्राऊ आणि त्याने पाळलेला कुत्रा ब्लांडी यांच्यासहित आत्महत्या केली.

नाझी हुकूमशहा, ॲडॉल्फ हिटलरवरील हे पुस्तक वाचनीय आहे.

विसाव्या शतकातल्या या बहुचर्चित व्यक्तिमत्त्वाच्या बऱ्याचशा परिचित पैलूंवर आणि अनेक रहस्यांवर या पुस्तकात प्रकाश टाकला आहे. कारण लोकांची हिटलरबद्दलची जिज्ञासा अजूनही जागृत आहे.

✦✦✦

# हिटलरचा जन्म

हिटलरचा जन्म २० एप्रिल १८८९ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता ऑस्ट्रियातल्या ब्रा इन या गावात झाला. हे गाव जर्मन बव्हेरियाच्या सीमेपलीकडे आहे. कोणत्याही व्यक्तीच्या फक्त घराण्यालाच (वंशावळीलाच) नव्हे, तर त्याच्या जीवनमरणालादेखील कारणीभूत ठरेल अशा एका आंदोलनाचे नेतृत्व करणं, हे बहुधा हिटलरच्या ललाटलेखातच लिहिलेलं असावं; परंतु त्याचं स्वतःचं घराणं खूपच गोंधळात गुरफटलेलं होतं आणि आयुष्यभर तो त्याच्या काळजीचा आणि लाजिरवाणा विषय ठरला होता.

त्याचे वडील ॲलाईस यांचा जन्म १८३७ मध्ये झाला. मारिया ॲना शिक्लग्रूबर आणि तिचा अज्ञात प्रियकर यांचा तो अनौरस पुत्र. मारियाचा प्रियकर एक तर कोणीतरी शेजारी असावा किंवा जोहन जॉर्ज हाइडलर नावाचा गरीब गिरणी कामगार असावा. हिटलरचे आजोबा ज्यू असावेत अशीही शक्यता काहीएक मर्यादेपर्यंत वर्तवली जाते.

मारिया शिक्लग्रूबरला फँकिन बर्गर नावाच्या एका श्रीमंत ज्यू परिवारात स्वयंपाकिणीचं काम मिळालं होतं. त्याच कुटुंबातील एका १९ वर्षांच्या तरुणापासून मारियाला दिवस राहिले आणि मग ॲलॉईसच्या जन्मानंतर तो तिला नेहमी पैसे पाठवीत राहिला होता.

आपले आजोबा नक्की कोण होते हे हिटलरला कधीच समजलं नाही. त्याला फक्त एवढंच माहीत होतं की, त्याचे वडील साधारण पाच वर्षांचे झाले तेव्हा मारिया शिक्लग्रूबरने जोहन जॉर्ज हाइडलबरोबर विवाह केला आणि नंतर केवळ पाच वर्षांतच त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर अनौरस ॲलॉईसला त्याच्या आईने आपल्या दिराकडे म्हणजेच ॲलॉईसच्या काकाकडे पाठवले. त्याने या छोट्या मुलाचा सांभाळ केला. त्याची लहानशी शेतीवाडी होती.

तेराव्या वर्षापर्यंत शेतीत काम करून ॲलॉईस त्या जीवनाला कंटाळला आणि परत त्यात पडायचं नाही असं ठरवून उदरनिर्वाहाच्या शोधात तो व्हिएन्नाच्या वाटेला

लागला. तिथे एका चांभाराकडे त्यानं काम शिकून घेतलं; पण लवकरच तो सरकारी नोकरीत शिरला आणि जकात खात्यात कनिष्ठ पदावर नोकरीला लागला. मग नोकरीत खूप कष्ट करून मोठ्या मेहनतीने त्याने सुपरवायझरची जागा मिळवली. १८७५ मध्ये त्याने वरिष्ठ साहाय्यक निरीक्षकाचे पद मिळवले. एका अल्पशिक्षित शेतकरी तरुणाच्या दृष्टीने हे मोठंच यश होतं.

त्यावेळी एक घटना अशी घडली की, ॲलॉईसच्या जीवनात गुंतागुंत निर्माण झाली. झालं असं की, ॲलॉईस नेहमी आपल्या आईचं आडनाव शिक्लग्रूबर हेच लावीत असे. त्यामुळे त्याला ॲलॉईस शिक्लग्रूबर असंच म्हटलं जाई. आपण अनौरस अपत्य आहोत ही गोष्ट लपवायचा त्याने कधी प्रयत्नही केला नाही. कारण ग्रामीण ऑस्ट्रियामध्ये अशा घटना प्रचलित होत्या. त्यांना विशेष महत्त्व दिले जात नसे.

परंतु त्याला सरकारी नोकरीत प्रतिष्ठा आणि मानमरातब प्राप्त झाल्यानंतर त्याच्या शेतकरी काकाला आपल्या पुतण्याने आता आपले आडनाव लावून आपल्या घराण्याचे नाव पुढे चालवावे असे वाटू लागले आणि त्याने ॲलॉईसकडे तसा आग्रह धरला. नंतर तोही तयार झाला; परंतु काकाचं आडनाव 'हाइडलर' होतं, ते रेकॉर्ड बुकमध्ये; मात्र ते 'हिटलर' असं दाखल केलं गेलं. अशा प्रकारे ३९ वर्षांचा ॲलॉईस शिक्लग्रूबर १८७६ मध्ये ॲलॉईस हिटलर बनला. ही घटना फारच महत्त्वाची ठरते. कारण पुढे जाऊन हजारो लाखो जर्मन लोक 'सलाम हिटलर'ऐवजी, 'सलाम शिक्लग्रूबर' म्हणून जयजयकार करताहेत, ही कल्पना करणंदेखील कठीण आहे.

नंतरच्या काळात काही प्रेमप्रकरणं आणि दोन अपयशी लग्नं यांच्यानंतर त्याने आपली लांबची पुतणी २४ वर्षांची क्लारा पोल्झल हिच्याशी तिसरा विवाह केला. त्यावेळी ती गर्भवती होती. ती त्याच्या काकाची, हाइडलरची मुलगी. तांत्रिक दृष्टीने ती त्याची लांबची पुतणी होती; परंतु तिने कॅथलिक चर्चची विशेष संमती घेऊन आपलं नाव बदललं होतं.

त्यांच्या पहिल्या विवाहापासून जन्मलेली दोन मुलं ॲलॉईस हिटलर ज्युनिअर आणि अँजेला या लग्नाला उपस्थित होती आणि नंतर ती या दोघांबरोबरच राहिली. क्लारा पोलझलला दोन मुलगे आणि एक मुलगी झाली; पण त्यातलं एकही मूल वाचलं नाही. २० एप्रिल १८८९ रोजी तिच्या चौथ्या मुलाचा जन्म झाला, ॲडॉल्फचा. हे मूल निरोगी, गुटगुटीत होतं. त्याचं बारसं रोमन कॅथलिक पद्धतीनं करण्यात आलं. त्यावेळी हिटलरचे वडील ५२ वर्षांचे होते.